# ‘काट्यावरची पोटं’ चा परिचय

**डॉ. बाळू बापू गायकवाड**
**श्रीमती एन.एन.सी महाविद्यालय,**
**कुसूंबा ता. जि. धुळे**
**मो.नं. ९६८९२५३७९०**

**प्रास्ताविक :-**

उत्तम बंडू तुपे हे १९७० नंतर लेखन करणाऱ्या दलित लेखकांतील ठळक नाव. ‘काट्यावरची पोटं’ हे सन १९८२ ला प्रकाशित झालेले आत्मकथन आहे. हे मांग (मातंग) समाजातील व्यक्तीने लिहिलेले पहिलेच आत्मकथन आहे. या आत्मकथनामध्ये एका व्यक्तीच्या जीवन संघर्षाचे वास्तव आहे. हे विस्तवी वास्तव लेखकाबरोबर त्याच्या समाजाचेही आहे. या आत्मकथनाबद्दल प्रस्तावनेत आनंद यादव म्हणतात, ‘‘आपल्या एकूणच आधुनिक समाजातील खालच्या स्तरातील माणूस आजही विसाव्या शतकाच्या शेवटच्या चरणात आपण कुठे ठेवला आहे? याचे जिवंत दर्शन म्हणजे हे आत्मनिवेदन होय.’’[१] सर्वच दलित आत्कथने ही दलित जातीतील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, दयनीय स्थितीचे चित्रणे स्पष्ट करतात. त्यामध्ये दया पवार यांचे ‘बलुतं’, बेबी कांबळे यांचे ‘जिणं अमुचं’, लक्ष्मण मानेंचे ‘उपरा’, नजुबाई गावीत- आदोर, किशोर काळेंचे ‘कोल्हाट्याचं पोर’ इ. आत्मकथने त्या-त्या दलित जातींचे भयानक वास्तव चित्रण स्पष्ट करतात. ‘काट्यावरची पोटं’ हे मांग समाजातील उत्तम बंडू तुपे यांचे आत्मकथन लेखकाच्या दयनीय स्थितीचे यथार्थ दर्शन घडविते. त्याबरोबरच मांग समाजाचेही दर्शन घडविते. ‘काट्यावरची पोटं’ चा परिचय सदर लेखातून केला आहे.

**‘काट्यावरची पोटं’ चा परिचय :-**

तुपेंचे ‘काट्यावरची पोटं’ हे आत्मकथन १९८२ ला प्रकाशित झाले. शिक्षण प्रवाहापासून लांब असलेल्या तुपेंनी आपल्या साहित्यातून सभोवतीच्या माणसांच्या व्यथा-वेदना ताकदीनिशी मुकर केल्या आहेत. ज्यांच्या अनेक पिढ्या समाजजीवनाच्या मूळ प्रवाहापासून कोसो दूर होत्या अशा दबलेल्या, दाबलेल्या समाजात तुपेंचा जन्म झाला.

भारतीय समाजव्यस्थेने अस्पृश्य ठरवलेल्या मांग जातीत त्यांचा जन्म झाला. कळू लागल्यापासून पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना सतत संघर्ष करावा लागला. वयाच्या ५व्या वर्षी तुपेंना कामाला जावे लागले. घरात सात भावंडे, आई-वडील असे दहा जणांचे कुटुंब

असल्यामुळे आणि तोकडे उत्पन्न त्यातून कसेबसे घर भागत असे. त्यांना लहान वयातच केकताडाच्या वाखापासून दोर व मोटेसाठी नाडा बनवून देणे किंवा फडे तयार करून विकणे हा त्यांच्या पारंपरिक व्यवसायात कष्टाला जुंपून घ्यावे लागते. शाळेत जायच्या वयातच शाळेच्या ऐवजी केकताड कापण्याची कत्ती तुपेंच्या हाती आली. त्यातूनच त्यांनी कसेबसे तिसरीपर्यंत शिक्षण घेतले. लहान वयातच आपले बेलवंडी हे खेडेगाव सोडून तुपे पुण्याला बहिणीकडे कामासाठी येऊन राहिले व शेवटपर्यंत पुण्यातच स्थायिक झाले असा खडतर जीवनप्रवास 'काट्यावरची पोटं' मध्ये पहायला मिळतो.

तुपे पुण्याला आल्यानंतरही समस्या सुटलेल्या नसतात. बहिणीची परिस्थिती गरीबीची असते. राहायला नीट जागा नाही. उत्पन्न कमी, त्यात उत्तमची भर. आपले बहिण व मेहुण्याला ओझे वाटू नये म्हणून जाळण्यासाठी लाकडे गोळा करणे, पाणी भरणे, बहिणींच्या मुलींना सांभाळणे इ. कामे उत्तम करतो. बहिणीच्या झोपडीत तो राहतो. चोहोबाजूने फळ्या ठोकलेल्या ,वरती पत्र्याचे छत, बाजुला गटार, दुर्गंधी अशा ठिकाणी उत्तम व त्यांच्या बहिणीचे कुटुंब राहते.

उत्तम तुपेंच्या आत्मकथनाबाबत भरत सगरे म्हणतात, ''सामाजिक परिवर्तन संक्रमण के काल में अपनी अस्मिता की रक्षा के लिए अपने अस्तित्व की, पहचान बनाएँ रखने के लिए संघर्षरत जनजीवन की यह कथा है! सगरे दलित साहित्य चिंतन के आयाम प्रस्तुत आत्मनिवेदन इसका प्रमाण है ऐसा लगता है।'' सगरेंनी केलेले वरील वर्णन या आत्मकथनाचे स्वरुप स्पष्ट करते.

**'काट्यावरची पोटं' मधील सामाजिक संघर्ष :-**

तुपेंनी 'मी' च्या द्वारे कथन केले आहे. सामान्यपणे पोट भरण्यासाठी जे कटू अनुभव आले ते वास्तवरुपाने मांडले आहेत. जीवनाविषयी आसक्ती, निराशा, दैन्य-दास्य यांच्याशी द्यावी लागणारी प्रखर झुंज, जीवनातील अगतिकता, माणुसकी, अमानुषता आणि कारुण्य या सगळ्या सामाजिक बाबींचे दर्शन या आत्मकथनात येते. या अर्थाने हे समाजदर्शन फक्त लेखकापुरते मर्यादित न राहता ते मांग समाजाचे बनते. दलिताच्या वाट्याला जे दु:ख येते त्या दु:खाच्या कारणांमध्ये अस्पृश्यतेचे अनुभव हे महत्त्वाचे कारण आहे. भालचंद्र फडके लिहितात, ''जोपर्यंत समाज व्यवहारात अस्पृश्यता ठाण मांडून बसली आहे तोपर्यंत माणूस स्वतंत्र आहे असे कसे म्हणता येईल.''[२] फडके यांचा प्रश्न चिंतन करायला लावणारा आहे. तुपेंच्या आत्मकथनात अस्पृश्यता विषयक अनुभव शालेय जीवनापासून आलेले आहे. घाटगे काका, भाई कोरान्ने यांनी मांग समाजाच्या मुलांसाठी शाळा सुरु केली. शाळेत कुळंवाड्याची पोरं होती. सकाळी पेज वाढायच्या वेळेला ही कुळवाड्याची पोरं मांग मुलांसोबत बसायची नाहीत. जेव्हा घाटगे काका ''एकत्र का बसत न्हाई'' असे बोलायचे तेव्हा मुले म्हणायची,

"मांगांच्या पंगतीला आपून नाही बसणार, तुम्ही आम्हासनी बाटवता काय?"[३] मुलांच्या या बोलण्यानंतर मनात उमटलेली कोणतीही भावना लेखक व्यक्त करीत नाही तटस्थपणे अनुभव कथन करतो.

सदानंद मोरे लिहितात, "सामान्यांच्या जीवन अभावाचे एक कारण असे संभवते की, तुपे यांना कुठल्याही चळवळीच्या स्पर्श झालेला नाही. चळवळीत असलेले दलित लेखक आपल्या पूर्वायुष्यातील अनुभवांकडे एका विशिष्ट भूमिकेतून पाहतात. ती भूमिका तुपेंकडे नाही." [४] सुभाष सावरकर म्हणतात, "अस्पृश्यतेच्या वास्तवतेने गावकुसाबाहेरील पालातले जिणं नशिबात असले तरी, ती काही दुर्लक्ष दरी आज उरलेली नाही."[५] सावरकर म्हणतात त्याप्रमाणे आज अस्पृश्यतेच्या संदर्भामध्ये पूर्वीसारखी स्थिती राहिली नाही.

**'काट्यावरची पोटं' मधील ताणतणाव :-**

'काट्यावरची पोटं' चा नायक उत्तम हा खेड्यातून झोपडपट्टीत राहण्यास येतो. या आत्मकथनात झोपडपट्टीच्या जीवनातील आर्थिक ताणतणावाचे दर्शन घडते. दलित आत्मकथनातील जीवन दर्शनाबद्दल अशोक पाटील लिहितात, "दलित स्वकथनाचे पैलू त्यांच्या जीवनाच्या बारकाव्यानिशी आलेले आहेत."[६] अशोक पाटील यांनी आत्मकथनास स्वकथन म्हटले. या स्वकथनातील हे वर्णन अशोक पाटलांच्या मतानुकूल आहे. आर्थिकदृष्ट्या गांजलेल्या उत्तमला दारिद्र्यामुळे धड अंगाला अंगभर कपडा मिळत नव्हता की, पोटाला पोटभर अन्न, राहत्या घराचा प्रश्न होता, जेथे तो राहत होत ती जागा दुर्गंधीयुक्त व आरोग्यास अपायकारक अशीच होती. परंतु राहत्या जागेपेक्षा अन्न व वस्त्र यांचे प्रश्न अधिकच गंभीर होते. दारिद्र्याचा प्रश्न, अन्न, वस्त्र, निवारा या घटकासंदर्भात प्रकर्षाने जाणवतो.

**अन्न :-**

लेखक व लेखकाच्या कुटुंबातील सदस्यांना खायला पुरेसे अन्न मिळत नाही. "सारं उरकलं की लिंबाच्या सावलीत बसून पोटावर पडायचं पुडं येईल ते पोटात भरायचं भूका लागलेल्या असायच्या म्हणताना चव धरायची न्हाय."[७] मुळात पोट भरणं जिथे महत्त्वाचे असते तिथे चवीचा प्रश्न उरत नाही. सुभाष सावरकर म्हणतात, " 'काट्यावरची पोटं' या लेखनामागील प्रेरणा हीच मूळी भूक आणि वासना यांच्या मगरमिठीत अडकलेल्या पाशवी अस्तित्व पातळीपासून मुक्ती अशा स्वरुपाची आहे."[८] सावरकारांचे हे मत बरोबर पण आहे. पण 'काट्यावरची पोटं' ची प्रेरणा केवळ भूक आणि वासना यातून मुक्ती एवढी नाही तर 'स्व' चा शोध घेणे हे देखील आहे.

**वस्त्र :-**

पराकोटीच्या दारिद्र्यामुळे जसे लेखकाला अन्न मिळत नव्हते. तसेच अंगाला अंगभर कपडेही मिळत नव्हते. आपल्या अवस्थेचे चित्रण करतांना उत्तम म्हणतो, ‘‘तवा काय आमचा अवतार! ढुंगणाला लंगोट नी अंगात बंडी-कशीबशी तरी काया झाकायची. कधी छातीवर बटन दिसलीच न्हायती.’’[९] आईची असणारी स्थिती वर्णन करतांना उत्तम लिहितो, ईस्कटलेलं केसं सतरा ठिकाणी गाठी दिलेलं जुन्यार, कष्टाच्या रगाड्यात कवा फाटलेलं सांधायलाबी येळ नायी, बघावं तवा आत वडलेला चेहरा. [१०] यावरून उत्तमच्या दारिद्र्याची कल्पना येते.

**निवारा :-**

आर्थिक विपन्नतेमुळे लेखकाला चांगले असे घर मिळाले नाही. तो जिथे केकताड कापण्याचा व्यवसाय सुरु असे. तेथे खोपटात राहत असे. याचे कारण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी  जावे लागे. जिथे पोटं भरायला पुरेसे अन्न मिळणे अवघड होते. चांगला निवारा कुठून मिळणार? लेखक पुण्याला जातो तेव्हा तो आक्काच्या घरात राहतो. अक्काचे घर झोपडपट्टीत होते. हे राहणं नरकारसारखं होते. झोपडपट्टीत शिरलं की, नरकात घातल्यासारखा वास नाकाला झोंबायचा, रोज भांडणे, रोज दंगा,  बारा गावची बारा बिऱ्हाड, कुणाचा कुणाला मेळ नाही तेथेच तुपेंनी शेवटचा श्वासही घेतला. आजही त्यांचे कुटुंब तेथे राहते.

**‘काट्यावरची पोटं’ मधून आलेल्या धार्मिक, सांस्कृतिक श्रद्धा व अंधश्रद्धा  :-**

अज्ञान व दारिद्र्य यांचे धार्मिक-सांस्कृतिक श्रद्धा व अंधश्रद्धा यांच्याशी घनिष्ठ नाते आहे. दलित समाजात शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. त्यामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण जास्त आहे. काही समजुती या समाजात आहेत. भुताला टाकलेला उतारा उत्तमचे वडील खायचे. कुणाच्या तरी अंगावरून उतरून टाकलेल्या कोंबड्याच्या मागे दादा पळायचा व त्याला पकडायचा. आपला दादा कुणीतरी मोठा योगी पुरुष आहे. त्याला खवीस, हडळ, झुटींग ही भूतं भितात असे उत्तमला वाटत होते. कुणालाही भुत लागलं की, दादा काढत असे. दादा देवर्षीचे काम करायचा. कुणाला ताप, थंडी जरी आली तरी त्याला दादाची आठवण व्हायची. उत्तमचे वडील देवर्षी होते ते भूत काढत असा त्यांचा बोलबाला होता. एकदा कोरान्ने साहेब आजारी पडतात. दादा त्यांना तोडगा सांगतात. आपल्या कुरणात एक लंगडा साहेब आहे. त्याची सवारी निघते त्याच्या झपाट्यात तुम्ही सापडला आहात. असे करा लंगड्या साहेबांच्या मूर्तीची स्थापना करा. तोडगा सांगून दादा अंगारा लावतात. कोरान्ने साहेब बरे होतात. नंतर लंगड्या साहेबांची मूर्ती हिवराच्या सावलीत स्थापली जाते तिला शेंदराने माखतात.

भुताला उतारा देणे, भुत काढणे, भुतं लागणे, मुठ मारणे, भुताचे कोणत्याही प्राण्याचे

रुप होणे या अंधश्रद्धा व समजुती, रुढी, परंपरा, रीती यांचे दर्शन आत्मकथनातून घडते. नवस बोलणे, फेडणे, जातीचा वृथा अभिमान या बाबींमधून परंपरा न सोडण्याची प्रसंगी आर्थिक छळ सोसण्याची वृत्ती दिसून येते.

**आत्मकथनात आलेले शारीरिक मोह-वासना यांचे चित्रण :-**

'काट्यावरची पोटं' मध्ये निरनिराळ्या स्त्रियांचे उत्तमशी आलेले संबंध यांचे वर्णन केलेले आहे. इ. तिसरीत असताना उत्तमच्या मनात आलेले भाव व्यक्त केले आहेत. लंगा-पोलकं घालणाऱ्या घाट्यागत भरलेल्या आनसी जवळ जगन मास्तर सारखा जायचा, तिच्या दंडाला धरायचा, गाल चुरायचा तेव्हा आनसी म्हणायची, माझ्या वडलांनाच सांगीन'' जगन मास्तर असं करू लागला की, उत्तमला त्याचा जीव घ्यावासा वाटे.

उत्तम म्हणतो, ''मला ही आनसी शिवाय करमायचे नाही. तिची सारखी संगत करावीशी वाटे. काहीतरी निमित्ताने आम्ही सारखे बोलत असू''[११] या ठिकाणी किशोरवयात मनाच्या घालमेलीचे, कामभावनेचे उत्तम चित्रण आढळते. तर जगन मास्तरच्या मनात विद्यार्थिनीबद्दल असले विचार येणे हे विकृत मनोवृत्तीचे उदाहरण म्हणता येईल. अशा प्रकारे लैंगिक भावनांच्या विकृतीचे वर्णन प्रस्तुत आत्मकथनामध्ये येते. लैंगिक भाव-भावनांचे वर्णन साहित्यात सामाजिक दडपणाखाली वेगळ्या शब्दात केले जाते. परंतु कोणताही आडपडदा न ठेवता उत्तमने लैंगिक वासना विकृती त्यातून समाजमनातील कुप्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे.

**'काट्यावरची पोटं' चे वाङ्मयीन मूल्यमापन :-**

वास्तव जीवनाची प्रांजल अभिव्यक्ती हे दलित साहित्याचे महत्त्वाचे मूल्य आहे, तुपेंनी या आत्मकथनात मी द्वारे अनुभव कथन केले आहे. कळू लागल्यापासून जवळपास तीस एकतीस वर्षाचा कालखंड यात आहे. या आत्मकथनात सलगता नसून आठवतील तशा आठवणी. जीवनातील पोट भरण्याच्या निमित्ताने जे कटू अनुभव आले येथे वास्तव रुपाने मांडले गेले असल्यामुळे जीवनाचा एक टप्पा म्हणून जरी असले तरी 'काट्यावरचं पोटं' ला पूर्णत्व प्राप्त करून देण्यात लेखक यशस्वी झाला आहे. खरे तर एका सामान्य माणसाला पोटाची खळगी भरण्यासाठी किती जीवघेण्या यातना सहन कराव्या लागतात याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. शिवाय आकाराने मोठ्या असलेल्या कुटुंबाची दारिद्र्यामुळे कशी वाताहत होऊ शकते, याचाही प्रत्यय यातून येतो. एकूणच तुपे यांचे 'काट्यावरची पोटं' हे आत्मकथन म्हणजे दलित माणसाला, त्याच्या समाजाला, त्याच्या व्यथा वेदनेला समजून घेण्याच्या दृष्टीने प्रस्थापित समाजाला सामाजिक आणि वाङ्मयीन दस्तऐवज ठरावे, एवढ्या मौलिकतेचे निश्चितच आहे.

**समारोप -**

दलित साहित्यातून आविष्कृत होत असलेल्या जाणिवा ह्या सामाजिक जाणिवा असून दलित आत्मकथनांच्या त्या मुख्य गाथा आहेत. दलित लेखक स्वत:संबंधी लिहूनही ओघाने त्याचा समाज या आत्मकथनात येतो. माणसाचे स्वातंत्र्य, मानवी मूल्य, विषय, समाजव्यवस्थेबाबतचा रोष आणि माणूस म्हणून जगणे याला दलित आत्मकथनात विशेष स्थान आहे. दलित समाजाला भोगाव्या, सहन कराव्या लागलेल्या यातनांची जाण या लेखकांना असल्याने याला कारणीभूत असलेली विषम समाजरचना ढासळून पडावी. आपल्या माथी मारलेले दलितपण निखळून पडावे आणि मानवी मूल्यांची प्रतिस्थापना व्हावी यासाठी हे एक साहित्य साधन मानून या लेखकाची लढाई चालू आहे.

उत्तम बंडू तुपेंच्या आत्मकथनातून मांग समाजाच्या दु:ख, वेदनांना वाचा फुटली आहे. जीवनभर भाकरीसाठी कराव्या लागलेल्या काबाडकष्टाची ती कहानी आहे. या आत्मकथनाने दलित साहित्यात मोलाची भर घातली आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) डॉ. सुरेश पैठणकर- 'दलित स्वकथनाचे अंतरंग- चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

२) अशोक पाटील-'दलितांचे स्वकथन' अनुष्ठुभ, मुंबई, वर्ष पाचवे, अंक-१ ला, जुलै-ऑगस्ट-१९८१.

३) आनंद यादव- प्रस्तावना 'काट्यावरची पोटं', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर-२००७.

४) भरत सगरे- 'दलित साहित्य चिंतन के आयाम', उन्मेष प्रकाशन, सातारा-२००९.

५) लालचंद्र फडके- 'दलित साहित्य वेदना व विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे-तिसरी आवृत्ती, २०००.

६) उत्तम बंडु तुपे- 'काट्यावरची पोटं', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तिसरी आवृत्ती.

७) सदानंद मोरे- 'एका सामान्य कष्टकरी दलितांचे समर्थ आत्मकथन : 'काट्यावरची पोटं', दै. श्रमिक विचार, १६ जाने. १९८३.

८) सुभाष सावरकर- एक परीक्षण- 'काट्यावरची पोटं', अक्षर वैदर्भी, अमरावती, ऑगस्ट-१९८४.